


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : २९४ वा | गुरुवार | दि. २३ जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# महाभ्रष्टाचारी डॉ.तडस यांच्यावर कारवाईसाठी का होतोय विलंब?

## भ्रष्टाचार पूर्णपणे सिद्ध होऊन देखील अद्याप कारवाई मात्र गुलदस्त्यात

**जनसंचलन/ बुलढाणा**

तत्कालीन जिल्हाशल्य डॉ. तडस यांच्या कार्यकाळात शासनाने करोडो रुपये मंजूर करूनही कोव्हिडं १९ काळात रुग्णांच्या उपचाराकरिता मॉड्युलर ओटीसाठी सोलापूर येथील हेल्थ केअर कंत्राटदारास कामाच्या सुरवातीलाच ८० टक्के रक्कम व काम अर्धवट असतांना सुद्धा निलंबित जिल्हाशल्य चिकित्सक डॉक्टर सुभाष चव्हाण यांनी उर्वरित असलेली करोडो रुपयांचे नियमबाह्य पेमेंट सर्व नियमधाब्यावर बसवून अदा केली आज पर्यंत मॉड्युलर ओटी कार्यान्वित नसून कोव्हिडं १९ काळापासून संबंधित सर्व जिल्हाशल्य चिकित्सक डॉ.नितीन तडस,प्रभारी जिल्हाशल्य चिकित्सक सह डॉ.सुभाष चव्हाण सह इतर व वादग्रस्त भांडारलाल प्रकाश बोथे यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा करीता तक्रारकर्ते २५ जानेवारी २०२५ ला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे बुलढाणा - येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस यांच्यावर भ्रष्टाचार आणि कामात अनियमितता केल्याचा आरोप आता पूर्णपणे सिद्ध झाला आहे. राज्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही या भ्रष्टाचाराची पूर्ण कल्पना आलेली आहे. भ्रष्टाचार सिद्ध झाल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाईचे आदेश देखील जारी केलेले आहेत. या स्थितीतही त्यांच्यावर अद्याप काय कारवाई करण्यात आली हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. कारवाई उघड न झाल्यामुळे महाभ्रष्टाचारी डॉ. नितीन तडस आणि त्यांच्या भ्रष्टाचारात सामिल झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे चांगलेच फावताना दिसून येत आही. त्यामुळे लवकरात लवकर त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात वर्षानुवर्षे प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. या भ्रष्टाचाराचे आकडे आता कोट्यवधींमध्ये नाही तर ते अब्जावधींमध्ये गेलेले आहेत. जिल्हा सामान्य रुग्णालयात खचितच असा कोणता विभाग उरला असेल, ज्यामध्ये भ्रष्टाचाराने घुसखोरी केली नाही.औषधे उपकरणांच्या खरेदीपासून ते बांधकामापर्यंत सगळीकडे भ्रष्टाचाराची घाण साचलेली आहे. विशेष म्हणजे भ्रष्टाचाराचा हा विषारी व्हायरस जिल्हा रुग्णालयात अनेक वर्षांपासून थैमान घालतो आहे. या विषारी व्हायरसचा एक प्रमुख स्रोत म्हणून डॉ.नितीन तडस हे समोर आलेले आहेत. डॉ नितीन तडस यांनी आपल्या कार्यकाळात भ्रष्टाचाराचे अनेक विक्रम प्रस्थापित केलेले आहेत.हा संपूर्ण भ्रष्टाचार सर्वांत आधी समोर आणण्याचे काम एक माध्यम समूह आणि जनतेचा जागता प्रतिनिधी म्हणून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने चव्हाट्यावर आणले. सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून, तसेच भ्रष्टाचाराचे पुरावे अगदी थेट मुंबईतील वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यथासांग पार पडले.दैनिक जनसंचलन मुळेच या भ्रष्टाचाराची धग ही थेट राज्याच्या विधानसभेपर्यंत पोहोचली होती. या सर्वांचा परिणाम म्हणून अखेर या भ्रष्टाचार प्रकरणी चौकशी करण्यात आली. या चौकशीत अनेक गंभीर आणि धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. भ्रष्टाचाराचे नवनवे प्रकार यातून समोर आले. या सर्व भ्रष्टाचाराच्या मुळाशी डॉ. नितीन तडस हे स्पष्टपणे सापडून आले. त्यामुळे अखेर वरिष्ठ अधिकाऱ्यांना या प्रकरणी कारवाई सुरू करावी लागली. काही दिवसांपूर्वी राज्याचे अवर सचिव अनिल सावरे यांनी एक सविस्तर पत्र काढून डॉ. नितीन तडस यांच्या भ्रष्टाचाराची गाथा मांडली, तसेच तडस यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनला प्राप्त झालेल्या माहितीनुसार २४ ऑगस्ट महिन्यात यासंदर्भातील आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामध्ये डॉ. तडस यांना आपले म्हणणे मांडण्याचे निर्देश देण्यात आलेले होते. डॉ. तडस यांनी आपले म्हणणे मांडले की नाही, यासंदर्भातील माहिती समोर आलेली नाही, परंतु ती त्यांनी मांडली असण्याची शक्यता वाटत नाही. कारण भ्रष्टाचारात पीएचडी केलेल्या डॉ. तडस यांना आपल्यावर होणाऱ्या कारवाईची कल्पना आली असेल. अवर सचिवांच्या पत्रानुसार खरे तर आतापर्यंत डॉ. नितीन तडस यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित होते. यासंदर्भात काय कारवाई करण्यात आली, याची माहितीही प्रसिद्धी माध्यमांना देणे गरजेचे होते. कारण अशाप्रकारे भ्रष्टाचार करणाऱ्यांवर या राज्यात कारवाई होते आणि त्यांना शिक्षा होते, हे समोर येणे गरजेचे होते. मात्र, या प्रकरणी काय कारवाई करण्यात आली, हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. भ्रष्टाचाऱ्यांना वाचवले जाण्याचा हा पॅटर्न काही नवा नाही.




सातत्याने कारवाई रेंगाळवत ठेवायची, चौकशी समित्यांचे वारंवार गठन करायचे, आलेले अहवाल प्रसिद्ध करायचे नाही, भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाईचे निर्देश हे फायलींमध्ये दाबून ठेवायचे, काहीही करून वेळकाढू धोरण अवलंबायचे, हे प्रकार आजवर या भ्रष्टाचार प्रकरणी सातत्याने झालेले आहेत. शासकीय यंत्रणा कितीही ढिसाळ असली आणि त्यांनी कारवाईसाठी कितीही चालढकल केली, तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र शांत बसणार नाही. दैनिक जनसंचलन सातत्याने याचा पाठपुरावा करीत राहणार आहे. जोपर्यंत डॉ. तडस सह सोलापूर येथील हेल्थ केअर कंत्रारदार इतर दोषी भ्रष्टाचारी यांच्यासारखे महाभ्रष्टाचारी गजाआड जात नाही, त्यांनी भ्रष्टाचारातून जमवलेली अवैध संपत्ती जप्त होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज भ्रष्टाचारविरोधातील आपल्या मोहिमेचा यज्ञ अखंडितपणे धगधगत ठेवणार, हे निश्चित.

**अजून बरेच काही पुढील भागात...**

# नांदुरा प्रकरणात ११ जणांविरोधात मकोका...

**जनसंचलन/ नांदुरा**

चार महिन्यांपूर्वी नांदुरा तालुक्यात कमी किमतीत स्क्रैप देण्याच्या बहाण्याने नागपूरमधील व्यापाऱ्यांना ९ लाख १० हजार रुपयांनी लुटणाऱ्या ११ आरोपींवर मकोका अर्थात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात ११ आरोपींना अटक करण्यात येऊन त्यांच्याकडून लुटण्यात आलेला बहुतांश मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मकोका लावण्यात आलेल्या आरोपींमध्ये टोळी प्रमुख संतोष शामराव सोनवणे (३५, वडोदा, नांदुरा), विलास प्रकाश काळे (वाडी), सय्यद हुसैन सय्यद अजमत (राणी पार्क), राहुल गणेश उमरकर (बिरोबानगर), सागर पुरुषोत्तम मुन्हे (रा. निमगाव), कविन बाबू भोसेल, सूर्योधन नरसिंग भोसले, समीर अकीम ऊर्फ हकीम पवार, निखिल सवलत पवार, देश नरविलाल पवार (सर्व रा. हलखेडा) आणि मधुकर विजयकुमार चौधरी (रा. कुन्हा) यांचा समावेश आहे. हे सर्व आरोपी नांदुरा, जळगाव जामोद व जळगाव खान्देश जिल्ह्यातील आहेत. या प्रकरणात प्रारंभिक तपासानंतर हा गुन्हा संघटित गुन्हेगारीचा असल्याचे निदर्शनास आले. ९ डिसेंबर २०२४ रोजी विशेष पोलिस महानिरीक्षक



(अमरावती) यांच्या आदेशानंतर या प्रकरणात मकोका लावण्यात येऊन हे प्रकरण एसडीपीओ विनोद ठाकरे यांच्याकडे वर्ग करण्यात आले.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गो. से. महाविद्यालयात काव्यवाचन स्पर्धा संपन्न

**जनसंचलन/ खामगाव**

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागाद्वारे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे काव्य संमेलन घेण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्वच शाख-ेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये १)सुमित गावंडे २)करण भारसाखळे ३)कीर्ती वाघ ४) श्रुतिका घोपे ५)वैष्णवी जवळकार ६)किरण दिवेकार ७)जोती खवले ८)वैशाली निकडे ९)रोशन बांगर १०)दीपाली वानखेडे ११)आरती निर्मल १२)जोती खवले आणि साक्षी आहिरकर १३)श्रावणी घुले आदी विद्यार्थ्यांनी आई-वडील, प्रियकर,प्रियसी, मराठी भाषा, वर्तमान राजकारण, समाजकारण इत्यादी विषयांवर काव्य सादर केले.मराठी विभाग विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचे काव्यवाचन,निबंध लेखन, वक्तृत्व, संवाद लेखन इत्यादी स्तुत्य वांग्मयीन उपक्रम वेळोवेळी राबवतात. आणि विद्यार्थी त्यामध्ये मोठ्या संख्येने भाग घेतात. या काव्यवाचन स्पर्धेचे अध्यक्ष इंग्रजी विभागाचे प्राध्यापक डॉ. डी. टी. आढाऊ यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल त्यांचे खूप खूप कौतुक केले व विद्यार्थ्यांनी आपल्या मधील सुप्त कलागुणांना योग्य वेळी ओळखून चालना देण्यासाठी महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांचे सहकार्य घ्यावे. अशा प्रकारे संबोधित करून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना काव्यवाचन स्पर्धेचे नियम व काव्यवाचन स्पर्धेचे महत्व सांगितले.या काव्यवाचन स्पर्धेचे परीक्षण राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. एम. टकले यांनी केले व



आपल्या काही स्वरचित काव्यरचना सादर केल्या. या कार्यक्रमासाठी मंचावर मराठी विभागाचे प्रा. विक्रम मोरे प्रा. डॉ. एच. डी. अकोटकर, उर्दू विभाग प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख, इतिहास विभागाचे प्रा.प्रदीप बाणाईत, प्रा. वाघमारे. हे उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन सुमित गावंडे यांनी केले तर कु.जोती खवले हिने उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कु. साक्षी अहिरकर, रोषण बांगर, क्रिपा धांदे, कारण भारसाखळे, आदि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत विविध पदासाठी पदभरती

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को) पुणे यांच्यामार्फत विविध पदासाठी पदभरती करण्यात येणार आहे. याकरीता गरजू माजी सैनिकांनी दि. २७ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को) पुणे यांच्यामार्फत दि. १२ जानेवारी रोजी जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. त्यामध्ये महासैनिक औद्योगिक वसाहत भोसरी येथे प्रकल्प व्यवस्थापक(एक पद), क्षेत्रीय व्यवस्थापक नागपूर (एक पद), व्यस्थापकीय मेस्को मुख्यालय पुणे (एक पद), व्यस्थापक लेखा मेस्को मुख्यालय पुणे(एक पद) आहे. यासर्व पदासाठी उमेदवार सशस्त्र सेना दल-ातील माजी सैनिक असावा. तसेच वयाबाबतचा निर्णय व्यवस्थापकीय मंडळाचा असेल. जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये काही बदल झालेला नसून अर्ज करावायाचा नमुना मेस्कोच्या वेबसाईट www.mescoltd.co.in वर उपलब्ध आहे.

# गो. से. महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाअंतर्गत लेखक प्रा. डॉ. हरिदास आखरे यांची भेट




**जनसंचलन/ खामगाव**

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या इमारतीत नवीन वाचन कक्षात (सेंटर ऑफ एक्सलन्स हॉल) मध्ये ११ जानेवारी २०२५ रोजी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत लेखक आपल्या भेटीला तसेच वाचन कौशल्य कार्यशाळा या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर तर प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध लेखक व संतसाहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. हरिदास आखरे हे होते. प्रा. डॉ. डी. एम. नागरिक (समन्वयक), प्रा. डॉ पृथ्वीराज ठाकूर हे मंचावर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे पुष्प-गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. अद्ययावत ज्ञान आत्मविश्वास निर्माण करते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. आखरे यांनी केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व, वाचन कसे करावे, कोणत्या प्रकारची पुस्तके वाचावी याविषयी मार्गदर्शन केले. लेखकांनी आपल्या भाषणात सांगितले की, ङ्कवाचन ही ज्ञानाची चावी आहे. वाचनामुळे आपले ज्ञान वाढते, आ-पली कल्पनाशक्ती विकसित होते आणि आपण एक चांगले नागरिक बनू शकतो. म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय लावली पाहिजे. आज संतसाहित्याकडे वळण्याची आपल्याला अत्यंत गरज आहे असेही ते म्हणाले.ङ्क कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. डी. एम. नागरिक यांनी केले. प्रा. डॉ पृथ्वीराज ठाकूर यांनी याप्रसंगी वाचन कौशल्य कार्यशाळा घेतली व वाचनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. या कार्यशाळेत त्यांनी वा-चनाचे विविध प्रकार, वाचनाचे तंत्र व उपयोगिता यांचे सादरीकरण केले. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर यांनी अध्यक्षीय भाषणात वाचनाच्या महत्वावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, ङ्कवाचनाने व्यक्तिमत्वात आणि विचारशक्तीमध्ये खूप फरक पडतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचनाला आपल्या जीवनाचा एक महत्व-ाचा भाग बनवायला हवे.ङ्क त्यांनी विद्यार्थ्यांना चांगले वाचन साहित्य निवडण्याची आणि त्याचा आवडीने अभ्यास करण्याचे आवाहन केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या ज्ञानाची गोडी लागवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमातून वाचनाचे महत्व समजून घेतले आणि त्यासाठी एक वाचन संकल्प घेण्याची प्रेरणा घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सौ. एन. बी. बोचे तर आभार प्रदर्शन प्रा. सौ. एस. जी. वायचाळ यांनी केले.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# जिल्हा क्रीडा पुरस्कार घोषीत...

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र शासनाचे क्रीडा धोरण २०१२ अंतर्गत क्रीडा क्षेत्रामध्ये मोलाचे कार्य करणाऱ्या खेळाडू, मार्गदर्शक, संघटक यांचे कार्याचा गौरव व्हावा, या उद्देशाने दरवर्षी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणामार्फत जिल्हा क्रीडा पुरस्कार देण्यात येतो. जिल्हा क्रीडा पुरस्कार निवड समितीमार्फत सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षाकरीता पुरस्कारार्थींची निवड करण्यात आलेली आहे. ते याप्रमाणे. जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२१-२२ : गुणवंत पुरुष खेळाडू - उज्वल भरत ओळेकर (धर्नुविद्या), गुणवंत दिव्यांग खेळाडू-अनुराधा पंढरी सोळंकी (तलवारबाजी) जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२२-२३ : गुणवंत क्रीडा मार्गदर्शक- अमर भिमराव खराटे (आट्यापाट्या), गुणवंत पुरुष खेळाडू-अजय विजय पहुरकर (जिम्नस्टिक), गुणवंत महिला खेळाडू- ऐश्वर्या श्रीकृष्ण भोंडे (फुटबॉल), गुणवंत दिव्यांग खेळाडू-शुभम दिनकर अवचार (ॲथलॅटिक्स) जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२३-२४: गुणवंत क्रीडापटु(पुरुष) - नयन प्रदीप सरडे (ॲथलॅटिक्स), गुणवंत क्रीडा मार्गदर्शक-अक्षय दिलीप गोलांडे (तलवारबाजी), थेट पुरस्कार-मानव गणेश जाधव (धर्नुविद्या). पुरस्काराचे स्वरुप १० हजार रुपये, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे असुन, दि. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाचे वेळी पोलीस कवायत मैदान, बुलढाणा येथे जिल्ह्याचे पालकमंत्री यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर यांनी कळविलेले आहे.

# राष्ट्रीय बालिका दिवसानिमित्त विशेष मोहिम

## सुकन्या समृद्धी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन


जनसंचलन/बुलडाणा

भारतीय डाक विभागामार्फत दि. २४ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय बालिका दिवसफ्ष दिवस साजरा करण्यात येणार आहे. या दिनानिमित्त जिल्ह्यातील आदिवासी, दुर्गम, डोंगराळ, वंचित व बँकिंग सेवा नसलेल्या भागातील मुलींच्या सक्षमीकरणासाठी सुकन्या समृद्धी योजना विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. मोहिमेंतर्गत सर्व नागरिकांनी जवळच्या डाक कार्यालयात संपर्क साधून आपल्या १० वर्षांच्या आतील मुलींचे सुकन्या समृध्दी खाते काढून मुलींचे भविष्य सुरक्षित करावे, असे आवाहन डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

# राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्र लॉन टेनिस संघाला रौप्य पदक

जनसंचलन/बुलडाणा

स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या अंतर्गत झारखंड शालेय शिक्षण व साक्षरता विभागाने रांची (झारखंड) येथे दि.१६ ते १९ जानेवारी दरम्यान ६८ व्या राष्ट्रीय शालेय लॉन टेनिस स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने रौप्य पदकावर आपले नाव कोरीत महाराष्ट्र राज्य क्रीडा विभागाचे नाव लोकीक केले. सांघिक प्रकारामध्ये संप्रित शर्मा, नीव कोठारी, लक्ष गुजराथी, अभिराम निखले, ओमकार शिंदे या सर्व खेळाडुंनी रौप्यपदक प्राप्त केले. महाराष्ट्राने झारखंड, पंजाब, सीबीएसई व चंदीगड संघावर विजय मिळवत रौप्य पदकाची कमाई केली. वैयक्तीक प्रकारात ओमकार शिंदेला रौप्यपदक व लक्ष गुलराथी याला कास्य पदक आपल्या नावे केले. मुलींच्या संघाने चौथ्या क्रमांक प्राप्त करत आपली वाटचाल कायम ठेवली. या यशाकरीता सर्व खेळाडुंचे तसेच संघ व्यवस्थापक डॉ. जीवन मोहोड, संघ मार्गदर्शक ओमकार साठे व राधिका महाजन यांचे जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर तसेच क्रीडा अधिकारी आर. आर.धारपवार, संदीप केळे, राज्य क्रीडा मार्गदर्शक उज्वला लांडगे व इतर सर्व कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# बेटी बचाओ, बेटी पढाओ या दशकपूर्ती निमित्त सायकल रॅली

## मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी व्यापक जनजागृती करा- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील



जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील मुलीचा जन्मदराचे प्रमाण वाढविण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे. गर्भलिंग निदान, तपासणी, कन्याभ्रूण हत्या, बालविवाह यासारख्या अनिष्ट प्रथाना आळा घालण्यासाठी बेटी बचाओ, बेटी पढाओफ या अभियानाची व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरामध्ये आज बेटी बचाओ बेटी पढाओफ या योजनेस १० वर्षपूर्तीनिमित्त जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाच्यावतीने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी हिरवी झेंडी दाखवून सायकल रॅलीला रवाना केले. यावेळी शाळाचे विद्यार्थी, महिला शिक्षक सहभागी झाल्या होत्या. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, मुलींचा घटता जन्मदर ही एक सामाजिक समस्या असून ती सोडविण्यासाठी प्रत्येकाने कटीबद्ध होणे आवश्यक आहे. यासाठी सर्वसामान्य लोकांपर्यंत प्रबोधन, जनजागृती करुन लोकशिक्षण व्हायला हवे. हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य असून समाजाचे संतुलन साधण्यासाठी महिला व पुरुषांचे प्रमाण योग्य हवे. बेटी बचाओ, बेटी पढाओ ही मोहिम मर्यादेत कालावधीसाठी न राबविता त्यांची व्यापक स्वरुपात अंमलबजावणी करावी, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या सुरवातीला उपस्थितांना बेटी बचाओ बेटी पढाओची शपथ देऊन स्वाक्षरी मोहिम राबविण्यात आली. त्यानंतर ङ्कबेटी बचाओ, बेटी पढाओफ सायकल रॅली जिल्हाधिकारी कार्यालय येथून सुरु होऊन कारंजा चौक, बोंडे सरकार चौकमार्गे भारत विद्यालय येथे रॅलीचा समारोप झाला. या रॅलीमध्ये जिल्हा परिषदचे अधिकारी, कर्मचारी तसेच भारत विद्यालय, प्रबोधनी विद्यालय, शारदा ज्ञानपीठ व एडेड हायस्कूलच्या विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. ङ्कबेटी बचाओ बेटी पढाओफ या योजनेस १० वर्षपूर्तीनिमित्त विविध विभागामार्फत दि. २४ जानेवारी ते ८ मार्चपर्यंत विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले यांनी दिली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नाथबाबा (गारपगारी) समाजाच्या दफनभूमी मधील अनधिकृत अतिक्रमण हटवाल तर बघाच!

## सुलतानपूर येथे आमरण उपोषण सुरू.. अज्ञात व्यक्तीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविला !

जनसंचलन/बुलढाणा

रात्रीच्या वेळेला सुलतानपूर येथील नाथबाबा (गार पगारी) समाजाच्या दफनभूमीमध्ये अज्ञात लोकांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसवून अतिक्रमण केले आहे. पुतळ्याला पर्यायी जागा देऊन अतिक्रमण हटविण्यासाठी नाथ बाबा (गारपगारी) समाज बांधवांच्या वतीने आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आलेली आहे. दिनांक ४ जानेवारी २०२५ रोजी रात्रीच्या वेळेला सुलतानपूर या ठिकाणी लोणार रोडला लागून असलेल्या नाथबाबा ( गारपगारी) समाजाच्या दफनभूमी मध्ये अज्ञात व्यक्तीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसवून अतिक्रमण केले आहे. या विषयाची चाहूल नाथ बाबा (गारपगारी )समाजाचे व्यक्ती आणि अनिल ठाकरे यांना आल्यामुळे त्यांनी ३ जानेवारी २०२५ लोणार तहसिलदार यांना या विषयी निवेदन सादर केले होते. तसेच संबंधित पोलीस प्रशासन व महसुल विभाग वरिष्ठ अधिकारी यांना सुद्धा निवेदन देऊन हे अनधिकृत अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात अनिल ठाकरे यांनी विनंती केलेली आहे. परंतु संबंधित अधिकारी यांनी निष्काळजी व हलगर्जीपणा केल्यामुळे या समाजाला नाईलाजास्तव दिनांक २० जानेवारीपासून आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे. ४ जानेवारी २०२५ ला ही बाब उघडकीस येताच सुलतानपूर ग्रामपंचायत विस्तार अधिकारी गजानन कावरके यांनी मेहकर पोलीस स्टेशन यांना लेखी स्वरूपात माहिती दिली. या ठिकाणी नाथबाबा (गारपगारी) समाजाची पूर्वापारपासून दफन भूमी (स्मशानभूमी) असल्याबद्दलचे रेकॉर्ड महसूल विभागात उपलब्ध आहे. या विषयीचा असलेल्या सातबारावर ४०७०ची नोंद आहे. परंतु गावात आणि समाजात कलह निर्माण होऊ नये म्हणून लोणार नायब तहसीलदार ईप्पर साहेब, मंडळ अधिकारी, तलाठी संतोष पनाड, हेडकॉन्स्टेबल केदार साहेब, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी गजानन कावरके, हेड कॉन्स्टेबल राजेश जाधव, तसेच गावकरी संगपाल नागवंशी पनाड, शिवप्रसाद जोगदंड यांनी उपोषण करत्या सोबत चर्चा करून तडजोड करण्याचा प्रयत्न केला. परंतु अनिल ठाकरे उपोषण करते यांनी त्यांच्या निर्णयाला मान्य न करता आमची दफनभूमी (स्मशानभूमी) लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळ्याचे अतिक्रमण काढून




आम्हाला जागा मोकळी करून वालकंपाऊंड करून देण्यात यावे असा निर्णय घेतल्यामुळे सर्वच हतबल होऊन परत गेले. दिनांक १६/०१/२०२५ रोजी सुलतानपूर ग्रामपंचायत विस्तार अधिकारी यांना लोणार तहसिलदार यांनी कोणतीही व्यक्ती ,संघटना, संस्था, शासकीय व निमशासकीय संस्थेच्या तसेच खाजगी मालकीच्या जागेवर मा. जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय पुतळा बसविता येत नसताना सुद्धा सुलतानपूर येथे हा प्रकार घडत आहे आपण पुतळा धोरण व दिनांक ३ मे २०१७ चे शासन निर्णयानुसार कार्यवाही करत नसल्याचे दिसून येत आहे तरी सदर प्रकरणी कार्यवाही करून कार्यालयास कळवावे अशी सूचना दिली होती.आता प्रशासन लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा हविटणार की, वाटाघाटी करण्याची तडजोड करणार, कोणता निर्णय घेणार याकडे सर्व गावकऱ्यांचे लक्ष लागून आहे.

# चिखलीत राजकीय भूकंप!

## तीन प्रमुख नेत्यांसह अनेक जणांचा भाजपात प्रवेश!

जनसंचलन/ चिखली

मतदारसंघात आज मोठा राजकीय भूकंप घडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे शेतकरी सेल प्रदेश सचिव संजय गाडेकर, त्यांच्या पत्नी आणि तेल्हारा ग्रामपंचायतीच्या सरपंच किरणताई गाडेकर, काँग्रेसचे चिखली शहर कार्याध्यक्ष निलेश अंजनकर, आणि युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष किशोर सोळंकी यांनी आपापल्या पक्षांना रामराम ठोकला आहे. या प्रमुख नेत्यांसह काही सरपंच, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत दुपारी चार वाजता अधिकृतरित्या भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. पक्षांतराचे हे वृत्त चिखलीसह







संपूर्ण जिल्ह्यात राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा निर्माण करत आहे. विशेष म्हणजे, तालुक्यातील मजबूत नेते भाजपच्या गोटात सामील झाल्याने आगामी निवडणुकीत विरोधकांसाठी मोठा धक्का मानला जात आहे. या राजकीय हालचालीने चिखलीतील सत्ता समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची चिन्हे आहेत.

# १६ लाखांचे चोरीचे सोने केले जप्त...

जनसंचलन/बुलढाणा

लोणार तालुक्यातील शारा येथे आदित्य अजितकुमार संचेती यांच्याकडील रोख रक्कम, सोने व चांदीचे दागिने लुटल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बीड जिल्ह्यातील दोघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून १५ लाख ७२ हजार रुपयांचे सोने जप्त करण्यात आले. या प्रकरणात ऋषिकेश बबन वेदरे (२८, रा. बेलोरा, जि. बीड) आणि अशोक फुलचंद शिंगणे (३२, रा. नागापूर, जि. बीड) यांना अटक करण्यात आली होती. या आरोपींना २४ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिस तपासात आरोपींकडून २०९.६५० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड जप्त करण्यात चोरी प्रकरणात जप्त करण्यात आलेले सोने आली आहे. संचेती यांना शारा येथे दुचाकी आडवी लावून लुटण्यात आले होते. ही घटना ११ ऑक्टोबर रोजी घडली होती. प्रकरणात पोलिस निरीक्षक अशोक लांडे, पोलिस उपनिरीक्षक प्रताप बाजड व पोलिस हेड कॉन्स्टेबल शरदचंद्र गिरी, पुरुषोत्तम आघाव, गजान गोरले, दीपक वायाळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी तपास करून कारवाई केली.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# धामणगावात शिवपुराण, अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ...

जनसंचलन/धामणगाव बढे

शिवपुराण व अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाला उत्साहात प्रारंभ झाला आहे. संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज समाधी सोहळ्यानिमित्त या कार्यक्रमाचे यंदाचे ३८ वे वर्ष आहे. या कार्यक्रमात दररोज काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, शिवपुराण कथा वाचन, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री श्रीहरीकीर्तनाचे आयोजनहोत आहे. भाविकांची मोठी गर्दी होत असून, महिलांचा सहभाग विशेषत्वाने लक्षणीय आहे. शिवपुराण कथा वाचन कल्पेश महाराज चौधरी (कळमसरा) हे करीत आहेत, २३ जानेवारी रोजी महिला कीर्तनकार मोनिकाताई येवले यांचे कीर्तन, २४ जानेवारी रोजी अरुण महाराज घोराडे (किन्ही सावडत) यांचे कीर्तन, २५ जानेवारी रोजी हभप विठ्ठल महाराज असोलेकर यांचे कीर्तन, २६ जानेवारी रोजी अभिषेक महाराज पवार यांचे कीर्तन, २७ जानेवारी रोजी गजानन महाराज कोल्हे (कुह काकोडा), २८ जानेवारी रोजी कल्पेश महाराज यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद व रंगीत संगीत भारूड कार्यक्रमाने सप्ताहाचा समारोप होईल.